होत. आजोबांना काहीच सांगितल नाही. फक्त आईला ठावूक होत. बरोबर १५ दिवसानंतर शाळेच्या गॅदरींगच्या दिवशी नाटक होत. नाटक पॅलेस थिऐटरमध्ये होते. नाटकाला शाळेतील मुले व काही पालकांना आग्रहाने बोलवलं होत. त्यात माझे आजोबा, वडील, आजी, आई, भाऊ बहीण हे सर्वजण होते. मी व्हॉलेंटियर आहे अस सर्वांना सांगितले होते.

बाबांच्या (भालजी पेंढारकर) जाधव नावाच्या मेकअप मनने माझा मेकअप केला. शिवाजी महाराजांचे कपडे घातले. दोन घंटांनंतर धूप सगळीकडे फिरवला. भारून टाकणार वातावरण निर्माण झालं. आजदेखील तो दिवस मला चांगला आठवतो. धूपाचा वास सगळीकडे दरवळत होता. मी भारावून गेलो होतो. त्याच अवस्थेत मी स्टेजवर एंट्री घेतली. टाळ्यांचा, शिट्टयांचा कडकडाट झाला. आयुष्यातील स्टेजवरची पहिली एंट्री घेतली. पहिल्या कडकडून पडलेल्या टाळ्या...... मला स्फुरण चढलं डायलॉग बोलण्यास म्हणण्यास सुरुवात केली .... टाळ्याच टाळ्या .... मला त्यावेळी हे देखील माहीत नव्हत की हा मेकअप मला कायमचा चिकटणार आहे. हे स्टेज माझ जीवन होणार आहे. हया टाळ्या माझा श्वास होणार आहेत... हया आगळ्या वेगळ्या सुंदर जगात मी कायमचा रममाण होणार आहे.

नाटक संपल आजोबांनी प्रेमाने गालावर पाठीवर हात फिरवला.. मला समाधान मिळालं ह्याचं हातांनी माझ्या पाठीवर रट्टे पडले होत. सर्वांनी माझ कौतुक केल. मला खात्री होती, की मला पहिलं बक्षीस मिळणार पण तिसरं बक्षिस मिळालं. मी फार नाराज होतो. चिडलो होतो. आईने ओळखले. 'का चिडलास' म्हणून मला विचारले. "आई सर्वात जास्त टाळ्या मला मिळाल्या.... अगदी पहिल्या एंट्रीपासून शेवटपर्यत प्रत्येक वाक्याला लोक व मुले मला दाद देत होती. पहिल बक्षीस मलाच मिळाल पाहिजे होते. मास्तरांनी दुजाभाव दाखवला. मला तिसरं बक्षीस दिल". मी चिडून म्हणालो आई हसली. व म्हणाली "नाटकात किती मुलांनी भाग घेतला". "जवळ जवळ २५ मुलांनी" – इती मी. "म्हणजे २२ मुलांना माहीच मिळाले नाही, होय ना". मी नुसतीच मान हलवली. "हे बघ रमेश २२ मुलांना काहीच मिळाले नाही तुला कमीत कमी तिसरं का होईना बक्षीस मिळाल, पण तू त्यांचा आनंद घेत नाहीस, उलट तू दु:खी आहेस. जे मिळालय त्यांचा आनंद न घेता जे मिळाल नाही त्यासाठी तू